परिशिष्ठ २

# सार्वजनिक आरोग्य विभाग

**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. दिनांक : २० एप्रिल २०००**

**अधिसूचना**

**जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९**

क्रमांक जमृनों. १०९९/८९६/प्र.क्र.१७३/कु.क.३ जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ (१९६९ चा १८) च्या कलम ३० द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन, केंद्र शासनाची मान्यता घेऊन याद्वारे महाराष्ट्र जन्म आणि मृत्यु नोंदणी नियम, १९७६ चे नियम रद्द करुन खालील नियम तयार करीत आहे ते म्हणजे :

१. **संक्षिप्त नाव व विस्तार :**

१) या नियमास महाराष्ट्र जन्म आणि मृत्यु नोंदणी नियम, २००० असे म्हणण्यात येईल.

२) हे नियम संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू करण्यात येतील.

३) हे नियम दिनांक १/४/२००० पासून महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील अधिसूचनेनुसार लागू करण्यात येतील.

४) हे नियम महाराष्ट्र जन्म आणि मृत्यु नोंदणी नियम, १९७६ व त्यानंतर त्या संबंधात वेळोवेळी अधिसुचित करण्यात आलेल्या सुधारणांची जागा घेतील.

२. **व्याख्या** : या नियमामध्ये संदर्भानुसार अन्यथा आवश्यक असेल तर,

अ) 'अधिनियम' म्हणजे जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ असा आहे.

ब) 'नमुना' म्हणजे या नियमांना सोबत जोडलेले नमुने असा आहे आणि

क) 'कलम' म्हणजे अधिनियमाचे कलम असा आहे.

३. **कलम २ (१) (ग) गरोदरपणाचा कालावधी :**

कलम २ चे पोटकलम (१) च्या खंड (ग) च्या प्रयोजनाखाली गरोदरपणाचा कालावधी हा अठ्ठावीस आठवड्यांचा असेल.

४. **कलम ४ (४) खाली सादर करावयाचा अहवाल –**

कलम ४ च्या पोटकलम (४) नुसार अहवाल या नियमांच्या सोबत जोडलेल्या नमुन्यात तयार करण्यात येईल आणि तो कलम १९ च्या पोटकलम (२) मध्ये निर्देशित केलेल्या सांख्यिकी अहवालासोबत, तो अहवाल ज्या वर्षाशी संबंधित आहे, त्या वर्षानंतरच्या वर्षाच्या ३१ जुलै पर्यंत मुख्य निबंधक, जन्म व मृत्यु याच्याकडून राज्य शासनास सादर करण्यात येईल.

५. **कलम ८ व ९ जन्म व मृत्यूची माहिती देण्यासाठी नमुने इ. –**

१) निबंधकास जन्म आणि मृत्यूची नोंदणी करण्यासाठी कलम ८ अथवा यथास्थिती कलम ९ अनुसार आवश्यक असलेली माहिती, जिवंत जन्म, मृत्यू आणि मृत जन्म (उपजत मृत्यु) यांच्या नोंदणीसाठी अनुक्रमे नमुना क्र. १, २ आणि ३ या माहिती नमुन्यामध्ये लेखी देण्यात येईल. (यापुढे या सर्वांना माहिती देण्याचे नमुने असे संबोधण्यात येईल.) आणि जर ही माहिती मौखिक स्वरुपात दिली असेल तर निबंधक संबंधित नमुन्यात समर्पक रकान्यामध्ये निरनिराळा तपशील नमूद करून, माहिती देणाऱ्याची सही / अंगठा घेईल.

२) माहिती नमुन्यांपैकी कायदेशीर माहिती असणाऱ्या भागाला 'कायदेशीर भाग' आणि सांख्यिकी माहिती असणाऱ्या भागाला 'सांख्यिकी भाग' असे म्हणण्यात येइल.

३) पोट कलम (१) मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे द्यावयाची माहिती, जिवंत जन्म, मृत्यु व मृतजन्म (उपजत मृत्यु) संबंधी घटना घडल्याच्या दिनांकापासून २१ दिवसाच्या आत देण्यात येईल.

६. **वाहनातील जन्म अथवा मृत्यु –**

१) चालत्या वाहनात जन्म अथवा मृत्यु झाल्यास, त्याबाबत कलम ८ च्या पोट कलम (१) अनुसार त्या वाहनाचा प्रभारी चालक पुढील प्रथम थांब्याच्या ठिकाणी माहिती देईल अथवा देण्याची व्यवस्था करील.

**स्पष्टीकरण :** या नियमाच्या प्रयोजनासाठी 'वाहन' या शब्दाचा जमीन, आकाश अथवा पाणी यावरुन चालणारे कोणतेही वाहन असा अर्थ अभिप्रेत आहे, आणि त्यामध्ये कोणतेही वाहन उदा. विमान, जहाज, आगगाडी, मोटरगाडी, मोटर–सायकल, गाडी, टांगा आणि रिक्षा इत्यादीचा समावेश आहे.

२)   ज्या बाबतीत तपास केला आहे पण कलम ८ च्या पोट कलम (१) च्या खंड (अ) ते (इ) मध्ये न येणाऱ्या मृत्यू बाबत कलम ८ च्या पोट कलम (१) अनुसार द्यावयाची माहिती तपास करणारा अधिकारी देईल अथवा देण्याची व्यवस्था करील.

**७.   कलम १० (३) नुसार प्रमाणपत्राचा नमुना –**

मृत्यूच्या कारणासाठी प्रमाणपत्र कलम १० खाली पोटकलम (३) अनुसार यथास्थिती नमुना क्रमांक ४ अथवा ४ अ मध्ये देण्यात येईल आणि निबंधक, मृत्यूच्या नोंदवहीमध्ये आवश्यक माहिती भरल्यानंतर अशी सर्व प्रमाणपत्रे उपमुख्य निबंधक जन्म मृत्यु, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नमुन्यात भरलेली माहिती ज्या महिन्यातील आहे त्या महिन्यानंतरच्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवील.

**८.   कलम १२ खाली नोंदणीवहीतील नोंदीचा द्यावयाचा उतारा –**

१)   कलम १२ अनुसार, जन्म आणि मृत्यु नोंदवहीमधील तपशीलाचा उतारा, माहिती देणाऱ्या व्यक्तीस यथास्थिती नमुना क्रमांक ५ अथवा नमुना क्रमांक ६ मध्ये देण्यात येईल.

२)   कलम ८ च्या पोट कलम (१) मधील खंड (अ) मध्ये निर्देश केल्याप्रमाणे, घरी घडलेल्या जन्म आणि मृत्यूच्या ज्या घटना, निबंधक, जन्म व मृत्यु यांना थेट कळविल्या आहेत, असा घर प्रमुख अथवा कुटुंब प्रमुख किंवा यथास्थिती त्याच्या अनुपस्थितीत घरी उपस्थित असलेला जवळचा नातेवाईक इतिवृत्त कळविल्यापासून ३० दिवसाच्या आत जन्म अथवा मृत्यु संबंधीचा उतारा निबंधक, जन्म व मृत्यू यांच्याकडून प्राप्त करील.

३)   कलम ८ च्या पोट कलम (१) मधील खंड (अ) मध्ये निर्देश केल्याप्रमाणे घरी घडलेल्या आणि उक्त कलमाच्या पोट कलम (२) अनुसार राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीकडून कळविलेल्या जन्म आणि मृत्यु घटनांच्या बाबतीत, अशी विनिर्दिष्ट व्यक्ती, निबंधक, जन्म व मृत्यु यांच्याकडून प्राप्त झालेले उतारे, संबंधित घर प्रमुखास अगर यथास्थिती, कुटुंब प्रमुखास अथवा त्याच्या अनुपस्थितीत घरात उपस्थित असलेल्या जवळच्या नातेवाईकाकडे ते, निबंधकाकडून प्राप्त झाल्याच्या दिवसापासून तीस दिवसांच्या आत, पाठवतील.

४)    कलम ८ च्या पोट कलम (१) च्या खंड (ब) ते (इ) मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे, संस्थांमध्ये घडलेल्या जन्म आणि मृत्यूच्या संबंधातील उतारा, नवजात बालकाचा अथवा मृताचा जवळचा नातेवाईक, संबंधित अधिकाऱ्याकडून अथवा संस्थांच्या प्रभारी अधिकाऱ्याकडून जन्म अथवा मृत्यु घटना घडल्यापासून तीस दिवसांच्या आत प्राप्त करुन घेईल.

५)    पोट कलम (२) ते (४) मध्ये निर्देश केलेल्या संबंधित व्यक्तीने, जर जन्म अथवा मृत्युसंबंधीचा उतारा, त्यामध्ये विहीत केलेल्या मुदतीत घेतला नाही तर, निबंधक अथवा पोट कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिकारी अथवा संबंधित संस्थांच्या प्रभारी व्यक्ती, सदर उतारे संबंधित कुटुंबास टपालाने पूर्वोक्त मुदत संपल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत पाठवतील.

**९.    विलंबीत नोंदणीसाठी प्राधिकारी व त्यासाठी द्यावी लागणारी विलंब फी –**

(१)    कोणत्याही जन्माची अथवा मृत्यूची माहिती, नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीनंतर परंतु जन्म अथवा मृत्यूच्या घटनेनंतर तीस दिवसांच्या आत निबंधकास दिली गेली असेल तर दोन रुपये विलंब फी भरल्यानंतर नोंदणी करण्यात येईल.

(२)    कोणत्याही जन्म अथवा मृत्युची माहिती, निबंधकास ही घटना घडल्यापासून तीस दिवसानंतर परंतु एक वर्षाच्या आत दिली गेली असेल तर यासाठी ग्रामीण भागासाठी गट विकास अधिकारी तसेच शहरी भागासाठी कार्यकारी आरोग्य अधिकारी / आरोग्य अधिकारी / मुख्याधिकारी / कार्यकारी अधिकारी यांच्या लेखी परवानगीने आणि पाच रुपये विलंब फी भरल्यानंतरच नोंदणी करण्यात येईल.

(३)    जर एखादी जन्म अथवा मृत्यूची घटना, घडल्यापासून एक वर्षाच्या आत नोंदणी झाली नसेल, तर त्या कार्यक्षेत्रातील कार्यकारी दंडाधिकारी यांच्या आदेशाने व रुपये दहा विलंब फी भरल्यानंतरच नोंदणी करण्यात येईल.

**१०.    कलम १४ च्या प्रयोजनासाठी कालावधी –**

(१)    जेव्हा कोणत्याही मुलाच्या जन्माची नावाशिवाय नोंदणी करण्यात आली असेल तेव्हा अशा मुलाचे आई–वडिल किंवा पालनकर्ता मुलाच्या नावासंबंधी माहिती तोंडी अथवा लेखी स्वरुपात निबंधकास मुलाच्या जन्म नोंदणीच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या आत देतील, जर अशी माहिती बारा महिन्यानंतर परंतु पंधरा वर्षाच्या आत दिली तर –